राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अनुदानीत दराने तूरडाळ व चणाडाळ वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः अधापु-२०१९/प्र.क्र.५२/ना.पु.२२
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २४ जुलै, २०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र. १४९/ना.पु.२२, दि. १२ सप्टेंबर, २०१७.
२) शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्र.अधापु-२०१९/प्र.क्र. ५२/ना.पु.२२, दि.१ मार्च, २०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाने खरेदी केलेला तूर व चणा यांची भरडाई करुन प्राप्त होणारी तूरडाळ व चणाडाळ महाराष्ट्र राज्यातील लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी यांना अनुदानीत दराने उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भाधीन दिनांक १ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. त्यावेळी तूरडाळ व चणाडाळ यांचे वाटप करताना प्रतिमहा प्रतिशिधापत्रिका १ किलो डाळ (दोन्हीपैकी १ डाळ १ किलो या कमाल मर्यादेत) याप्रमाणे वाटप करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. परंतु, आता केंद्र शासनाने फारच कमी प्रमाणात तूर व पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात चणा उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे डाळींच्या वाटपामध्ये सुलभता व्हावी या दृष्टीने यापुढे डाळींचे वाटप करताना शिधापत्रिकाधारकांना त्यांच्या मागणीनुसार प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका जास्तीत जास्त २ किलो डाळी (दोन्ही डाळी हव्या असल्यास तूरडाळ १ किलो आणि चणाडाळ १ किलो किंवा फक्त तूरडाळ हवी असल्यास तूरडाळ १ किलो किंवा फक्त चणाडाळ हवी असल्यास चणाडाळ १ किंवा २ किलो) याप्रमाणे वितरित करावयास परवानगी देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने संदर्भाधीन दिनांक १ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील डाळीच्या परिमाणात सुधारणा प्रस्तावित करण्यात येत असून, राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका २ किलो डाळी वाटप करण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

१) लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना यापुढे तूरडाळ व चणाडाळ यांचे वाटप करताना शिधापत्रिकाधारकांना त्यांच्या मागणीनुसार प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका जास्तीत जास्त २ किलो डाळी (दोन्ही डाळी हव्या असल्यास तूरडाळ १ किलो

आणि चणाडाळ १ किलो किंवा फक्त तूरडाळ हवी असल्यास तूरडाळ १ किलो किंवा फक्त चणाडाळ हवी असल्यास चणाडाळ १ किंवा २ किलो) याप्रमाणे वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२) माहे जून, २०१९ करीता वाटप करण्यासाठी नव्याने प्राप्त होणाऱ्या डाळींची विक्री तूरडाळ प्रतिकिलो ₹५५/- व चणाडाळ प्रतिकिलो ₹४५/- या दराने करावयाची आहे.

३) लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना यापूर्वी विविध दराने वितरीत करण्याकरिता उपलब्ध करुन दिलेल्या शिल्लक डाळींची विक्री त्या-त्या वेळी निर्धारित केलेल्या दरानेच करण्यात यावी. परंतु, त्या वाटप करताना देखील उपरोक्त परिमाणाप्रमाणे त्या डाळींचे वाटप करण्यात यावे.

४) सदर तूरडाळ व चणाडाळ यांची विक्री करण्याकरिता रास्तभाव दुकानदारांना ₹ १.५० प्रतिकिलो एवढे मार्जीन देण्यात येईल.

५) याकरिता होणारा खर्च या विभागाच्या स्वीय प्रपंजी लेख्यातून करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२४१६०९१९७३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant Raghunath Wadikar

Digitally signed by Hemant Raghunath Wadikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9d625ae15602d3ab3345690ad8034be0a2c6937e181f74a8b36405029a161ebf, cn=Hemant Raghunath Wadikar
Date: 2019.07.24 16:14:26 +05'30'

(हेमंत वाडीकर)

कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१२. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१३. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई

१४. सर्व उपायुक्त (पुरवठा)
१५. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१६. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
१७. सर्व अधिकारी (सचिव वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१८. सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१९. सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२०. सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२२. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई
२३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, मुंबई
२६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, मुंबई
२७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
२८.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखा परिक्षा मंडळ द्वारा - वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२९.वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई
३०.प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक
३१.सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३२. NCDEX e Market Limited, 1st Floor, Ackruti Corporate Park, LBS Road, Kanjur Marg (W), Mumbai.
३३. निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).